नाशिक महानगरपालिका , नाशिक
मध्यवर्ती भांडार विभाग
सर्व साधारण अटी शर्ती ( कोटेशन)

१) कोटेशन सोबतची कोटेशनधारकाची कोणतीही अट मान्य करता येणार नाही . सशर्त कोटेशन तात्काळ रद्द करण्यात येईल .

२) कोटेशन नोटिस मध्ये नमुद केलेली संख्या ही अंदाजे असुन त्यामध्ये कमी जास्त होण्याची शक्यता आहे

३) दिलेल्या मुदतीमध्ये संपुर्ण मालाचा पुरवठा करणे / काम करणे / सेवा पुरविणे आवश्यक आहे काही अपरिहार्य कारणास्तव मालाचा पुरवठा करणे शक्य नसल्यास तशी मुदतवाढ मिळणेबाबतचा आगाऊ अर्ज करणे आवश्यक राहिल . तथापी मुदतवाढ द्यावयाची किंवा कशी या बाबत महापालिकेचा निर्णय अंतिम राहील .

४) ज्यांची संपुर्ण किंवा भागश : कोटेशन दर मंजुर होईल त्या कोटेशनधारकास महानगरपालिकेचे लाभात र रु ५२०/- चे जनरल स्टॅप पेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल . तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल .

५) जी.एस.टी करासह कोटेशन दर नमुद करावयाचे आहे. कोणत्याही टॅक्सची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही .

६) मुदतीत मालाचा पुरवठा न केल्यास / काम न केल्यास / सेवा न पुरविल्यास अशा उशिरा प्राप्त झालेल्या मालावर / केलेल्या कामावर / सेवा पुरविण्याच्या रकमेवर दर हजारी दर दिवसाला र . रु १ याप्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल व सदरची रक्कम कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

७) सदरचे मंजुर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार पुरवठा करणे बंधनकारक राहील.

८) एकुण बिलाच्या रक्कमेतुन कामाचे स्वरुप विचारात घेता आवश्यकतेनुसार ५ टक्के सुरक्षा अनामत रक्कम कपात करण्यात येईल . मालाचा पुरवठा झाल्यानंतर सहा महिन्यापर्यंत मालाच्या दर्जाबाबत काही तक्रार न आल्यास अथवा प्रयोजनाचा हेतु पुर्ण झाल्यानंतर मागणीनुसार सदरची रक्कम परत करण्यात येईल.

९) मुदतीत मालाचा पुरवठा न झाल्यास / मुदतीत काम पुर्ण न केल्यास सदरचा माल / काम कोटेशनधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहुन करुन घेण्यात येईल आणि त्या कामी महानगरपालिकेस मंजुर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो कोटेशनधारकाकडुन वसुल करण्यात येईल .

१०) मंजुर नमुन्याप्रमाणे / स्पेशिफ़िकेशनप्रमाने मालावर पुरवठा न झाल्यास /काम न झाल्यास माल परत करण्यात येईल / अथवा सेवा नाकारण्यात येईल व त्याबाबतचा महानगरपालिकेचा निर्णय अंतिम राहील .

११) कोणताही माल मंजुर केलेल्या दराने कोटेशनधारकाकडुन खरेदी करण्याची महानगरपालिकेवर सक्ती नाही . याबाबत कोटेशनधारकास नुकसानभरपाई मागता येणार नाही .

१२) अटी / शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील .

१३) कोटेशन दर मंजुर झालेनंतर सदरच्या मालाच्या दरात / कामाच्या दरात/सेवेच्या/दरात काही वाढ झाल्यास वाढलेल्या दराप्रमाणे कोटेशनधारकास जादा पैसे मिळणार नाही .

१४) पुरवठाधारकाने अटिशर्तीचा भंग केल्यास त्यांचे बिलातुन रक्कम जप्त करण्यात येईल.

१६) काही अपरिहार्य कारणास्तव देयके अदा करणेस उशिर झाल्यास त्यावर व्याज अनुदेय राहणार नाही.

१७) मा.शासनाचे गव्हमेंट ई मार्केटप्लस (GeM) पोर्टलवर सदरचे बाबीचे दर उपलब्ध असलेस आणि गुणवते बाबत साम्य असलेस अशा बाबत (GeM) वरील दराशी तुलना करणेत येईल . पोर्टलवरील दरापेक्षा कोटेशन दर कमी असलेस असे दर मंजुर करणे बाबत विचार करणेत येईल अन्यथा (GeM) वरील दराने खरेदी करणे बाबतचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

Sd/-
(मनोज घोडे पाटील)
उप आयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका नाशिक

सदरचे अटि शर्ती मी वाचल्या असुन सदरच्या अटी शर्ती मान्य व कबुल असुन त्याप्रमाने माल पुरविण्यास / सेवा पुरविण्यास / काम करण्यास मी तयार आहे . त्यासाठी स्वाक्षरी करत आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

नाशिक महानगरपालिका नाशिक
मध्यवर्ती भांडार विभाग
कोटेशन नोटीस २०२१

नाशिक महानगरपालिकेस खालील तक्तयात नमुद केलेले साहित्य पुरविणे कामी दर मंजुर करुन त्या दराने काम करणेस अनुभवी पुरवठादार व व्यावसायिक यांचेकडुन कोटेशन मागविण्यत येत आहे .

| अ.क्र | तपशिल | अंदाजे संख्या |
|---|---|---|
| १ | स्ट्रील कपाट, सेल्फ- ३, स्टोअरवेल<br>साईज, ४८ X ३० X १७ इंच<br>गेज- १८ / २०, | ०३ नग |

अटि / शर्त

१) वरील कामाचे कोटेशन पत्रक (अटिशर्तीसह www.nashikcorporation.in) या संकेत स्थळावर दि.०३ /०९ /२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजे पावेतो उपलब्ध आहे .
२) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतीम मुदत दि .०३/०९ /२०२१ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत राहील . मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही .कोटेशन पाकिटे मध्यवर्ती भांडार विभाग, राजीव गांधी भवन शरणपुररोड येथे स्विकारण्यात येतील .
३) सदरचे साहित्य नाशिक महानगरपालिका मुख्यालय किंवा आदेशात नमुद केल्याठिकाणी पोहोच करावे लागेल . त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.
४) सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत . कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही . कोटेशन सोबत पॅन कार्ड, वैध शॉप अँक्ट दाखला तसेच जीएसटी नोंदणी बाबतचे कागदपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय कोटेशनचा विचार केला जाणार नाही.
५) मा.महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक —भाखस-२०१४ /प्र.क्र.८२ भाग ३/उद्योग, दिनांक १ डिसें २०१६ या शासन निर्णया सोबतच्या खरेदी पुस्तिकेतील परिच्छेद क्र .५.१४ मधील तरतुदीनुसार सूक्ष्म व लघु उद्योगांकरीता वस्तुंचे आरक्षण देण्यात आलेले असल्याने त्यांना प्राधान्य देण्यात येईल.
६) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.
७) सदरचे दरपत्रकात सर्व करासह व अनुषंगीक खर्चासह दर नमुद करावयाचे आहेत . कोणतयाही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.

Sd/-
(मनोज घोडे पाटील)
उप आयुक्त (प्रशासन)
नाशिक महानगरपालिका नाशिक

नाशिक महानगरपालिका , नाशिक

मध्यवर्ती भांडार विभाग

कोटेशन फॉर्म २०२१

**कामाचे नाव ;-** नाशिक महानगरपालिकेस स्ट्रील कपाट (लहान) पुरवठा करणे.

**कामाची मुदत ;-** १. पुरवठा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाच्या आत सर्व मालाचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

२. सदरचे दर ९० दिवसा पावेतो बंधनकारक राहातील.

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत ;-** दि. ०३ /०९ /२०२१ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत

**कोटेशनधारकाचे नाव व पत्ता ;-** ------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------------------

**संपर्क क्रमांक ;------------------------**

उक्त प्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफ़िकेशन नुसार साहित्य पुरविणेकामी मी / आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत .

| अ.क्र | तपशिल | संख्या | दर सर्व करासह प्रती नग रक्कम रु | सर्व करासह एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | स्ट्रील कपाट, सेल्फ- ३, स्टोअरवेल साईज, ४८ X ३० X १७ इंच गेज- १८ / २०, | ०३ | | |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटि शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत . सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने ९० दिवसा करीता कालावधीकरीता उक्त स्टेशनरी व इतर साहित्याचा पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे .

दिनांक:-

ठिकाण:-

निविदाधारकाची सही व शिक्का

---

कार्यालयीन उपयोगासाठी